International Journal of Engineering, Management and Humanities (IJEMH)
Volume 2, Issue 2, pp: 90-95 www.ijemh.com

# नवीन शिक्षण धोरण 2020 : आकलन आणि विश्लेषण

प्रा. डॉ. आनंदराव शिंदे
*विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग*
*कै. बापुसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय हणेगांव*
*जि. नांदेड, महाराष्ट्र राज्य, भारत*

Date of Submission: 18-03-2021 Date of Acceptance: 01-04-2021

**सारांशः** भारतीय शिक्षण व्यवस्थेत क्रांतीकारी बदल सुचविणारे नवीन शिक्षण धोरण 2020 हे सर्वार्थाने परिवर्तनकारी आहे. केजी ते पीजी शिक्षणक्रमाची रचनात्मक चौकट बदलणाऱ्या या धोरणाबाबत सर्व स्तरातून चर्चा होत आहे. तब्बल दोन लक्ष अभिप्राय आणि सूचना आलेल्या या धोरणाच्या विरोधात टिका–टिपणी तर समर्थनार्थ स्वागत आणि प्रशंसा होत आहे. नवीन शिक्षण धोरण हे केवळ भारतीय शिक्षण व्यवस्थेशी संबंधित आहे असे नाही; तर त्याचा दूरगामी परिणाम भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक आदी क्षेत्रावर पडणार आहे. या धोरणात किमान या सर्व क्षेत्रातील अंतरसंबंधाचा विचार करण्यात आलेला आहे. या अगोदरच्या 1968 आणि 1986 च्या शिक्षण धोरणाच्या तुलनेत हे नवीन शिक्षण धोरण अधिक सर्वसमावेशक आणि सर्वव्यापी स्वरुपाचे आहे. अगदी आंगणवाडी अर्थात पूर्वप्राथमिक पासून ते उच्च शिक्षणातील संशोधकीय पदवी पर्यंतच्या अभ्यासक्रम आणि पाठयक्रमाच्या पूर्नरचनेची चर्चा यात करण्यात आली आहे. या धोरणात प्राचीन भारतीय वारसा, संस्कृती, कला, मूल्य, भाषा यांचे पूर्नजीवन करताना भारतीय शिक्षण व्यवस्था ही आंतरराष्ट्रीय कशी होईल याचाही विचार करण्यात आला आहे. मूल्यशिक्षणासोबत व्यावसायिक व रोजगारभिमुख अभ्यासक्रम, प्रादेशिक तथा मातृभाषेतून शिक्षण, डीजीटल शिक्षण, आंतरविद्याशाखीय दृष्टीकोण आदी नवीन बाबींचा यात अंतर्भाव करताना पूर्वीच्या विद्याशाखांचे कृत्रीम वर्गीकरण यात संपूष्टात आणले जाणार आहे. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या हेतूने या धोरणात व्यावसायिक कौशल्यावर आधारीत रोजगारभिमुख पाठयक्रमाला प्राधान्य देण्यात आले असून शाश्वत विकासाच्या संकल्पनेतील सर्वांगीन विकासाच्या अनुषंगाने विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी अभ्यासक्रम आणि आकृतीबंध या दोन्हीमध्ये बदल करुन मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शिवाय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी 21 व्या शतकातील गरजा आणि आव्हाने यांचा विचार करुन संशोधनाला अग्रक्रम देण्यात आलेला आहे; त्यासाठी संरचनात्मक बदल केला जाणार आहे. 21 व्या शतकाशी सुसंगत, नव्या जगाशी स्पर्धा करु शकेल अशा नव्या ज्ञानाधारीत समाजाची निर्मिती ही या शिक्षण धोरणाचा अंतस्थ हेतू आहे. नवीन शिक्षण धोरणाला केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजूरी दिली असून 2023 पासून धोरणाची अशंतः यथावकाश अंमलबजावणी केली जाणार आहे. धोरणातील बऱ्याच बाबींची अंमलबजावणी ही 2040 पर्यंत केली जाणार असल्यामुळे धोरणाच्या परिणामाचे सर्वंकष मूल्यमापन करण्यास वेळ लागणार आहे. तथापि धोरणाच्या अनुषंगाने संभाव्य बदल आणि परिणामांचे अनुमान करीत असताना भविष्यात या निमित्ताने निर्माण होणाऱ्या संधी आणि आव्हाने या दोन्ही बाजूंचा सारासार विचार करणे अत्यावश्यक ठरते. कोव्हीड 19 च्या पार्श्वभूमीवर या नवीन शिक्षण धोरणाची प्रासंगिकता विशेष महत्त्वाची वाटते. संपूर्ण जग या पॅनडामिक परिस्थितीतून जात असताना शिक्षण व्यवस्थेलाही यातून पर्याय शोधावे लागणार आहेत हे या धोरणातून सूचित होते. मागील वर्षभरापासून संपूर्ण जगभर चालू असलेला कोव्हीडचा थैमान पाहता भविष्यात ऑनलॉईन शिक्षण प्रणालीला विशेष प्राधान्य द्यावे लागणार हे निश्चित आहे. त्या दृष्टीने या बाबींचा आवर्जून उल्लेख करण्यात आला असून भविष्यात तशी व्यवस्था निर्माण करण्याचे सुतोवाच नवीन शिक्षण धोरणात आहे.

**सूचक शब्दः** शिक्षणाचा आकृतीबंध, रोजगारभिमुख शिक्षण आंतरविद्याशाखीय, व्यावसायिक कौशल्य, स्वायत्ता, सामंजस्य करार, डीजिटल शिक्षण

## I. प्रस्तावना

"विद्येविना गती गेली
गती विना मती गेली,
मती विना शुद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले"[1]

म. फुलेंनी वरील चार ओळीतून शिक्षणाचे महत्त्व हे मानवी जीवनाच्या अस्तित्वासाठी किती अत्यावश्यक आहे हे अगदी समर्पक शब्दांत पटवून दिले आहे. अन्न, वस्त्र, निवारा या जशा मणुष्याच्या मुलभूत गरजा आहेत, तसे आजच्या युगात शिक्षण ही सुध्दा एक प्रकारे अत्यावश्यक गरज बनलेली आहे. व्यक्तीच्या सर्वांगीन विकासासाठी शिक्षण ही अत्यावश्यक अट असून शिक्षणाशिवाय व्यक्तीगत आणि सामाजिक अशा कोणत्याही स्वरुपाच्या प्रगतीची अपेक्षा करणे चुकीचे ठरणारे असेल. काळाच्या बदलत्या प्रवाहाप्रमाणे सामाजाची शिक्षणविषयक गरजा आणि अपेक्षा सुध्दा बदलत असतात. बदलत्या परिस्थितीमध्ये सामाजिक प्रश्नांची सोडवणूक आणि भविष्यकालीन समस्यांचा वेध घेण्याची क्षमता शिक्षणात हवी असते; त्यामुळे काळाप्रमाणे शिक्षण आणि शिक्षण व्यवस्थेत बदल करावा लागतो. भारतात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरही शैक्षणिक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी व शिक्षण व्यवस्थेसंबंधी शिफारशी करण्यासाठी अनेक समित्या आणि आयोग नेमले गेले. अतापर्यंत एकून सात वेळेस भारतातील शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी तथा भविष्यकालीन शिक्षणविषयक योजना आखण्यासाठी वेगवेगळे आयोग नेमले गेले. नवीन शैक्षणिक धोरणाच्या आखणीसाठी 2016 मध्ये माजी केंद्रीय सचिव टि. एस. आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सुब्रमण्यम समितीच्या अहवालाचा अभ्यास करुन इस्त्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्य असलेला शिक्षण आयोग नेमला गेला. शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी सांगड घातल्या गेलेल्या या धोरणात देशाला चैतन्यशील, प्रज्ञावंत समाज व जागतिक महासत्ता बनवत प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आगळया क्षमतांचा विकास करणे हे या धोरणाची ओळख आहे. दोन वर्षाच्या प्रतिक्षेनंतर आयोगाने आपला विस्तृत अहवाल सादर केला आणि 29 जूलै 2020 रोजी मा. प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केंद्रीय मंत्रीमंडळाने या धोरणाला मंजूरी दिली आहे.

## II. विषय ओळख

स्वातंत्र्यानंतर भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये वेगवेगळे बदल आणि प्रयोग करण्यात आलेले आहेत परंतु भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडवून आणणारे हे पहिलेच धोरण असून याचा भारतीय शिक्षण व्यवस्थेसह सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक आदी अनेक क्षेत्रात दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. खरेतर केजी ते पीजी अशा स्वरुपाचे तळा पासून शिखरापर्यंत परिवर्तन घडून आणणारे धोरण आखून सरकारने एक प्रकारे धाडसाचे पाऊल टाकले आहे. सरकारने या धोरणाला मंजूरी दिल्यापासून धोरणाच्या समर्थनार्थ आणि विरोधात मोठया प्रमाणात

चर्चा होत असून भारतीय शिक्षण व्यवस्थेची जी शिक्षणाची चौकट होती ती बहुतांश प्रमाणात बदलण्याची शक्यता आहे.

21 व्या शतकातील नवीन आव्हाने आणि समस्यांचा सामना करण्याच्या हेतूने हे शिक्षण धोरण महत्त्वाचे असून सर्वांना संधी, निःपक्षपात, दर्जेदार, परवडणारे, आणि उत्तरदायित्व यावर आधारलेले हे शिक्षण धोरण असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. तथापि येणाऱ्या काळात या धोरणाचा संभाव्य परिणाम काय होणार आहे? कोणत्या नवीन संधी आणि समस्या निर्माण होणार आहेत? देशाची वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, बदलते तंत्रज्ञान, उद्योग–व्यवसायाचे बदलते स्वरुप, जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या पार्श्वभूमीवर या धोरणाची उपयुक्तता तपासणे अत्यावश्यक ठरते. या धोरणावर होणाऱ्या टिका, आक्षेप यांचा आढावा घेताना भविष्यात या धोरणाची प्रासंगिकता काय असणार या दृष्टीने या धोरणाचा अभ्यास या लेखात करण्याचे प्रयोजन आहे.

## III. उद्दिष्ट्ये

1. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील उच्च शिक्षणाबाबतचा दृष्टीकोण अभ्यासणे.
2. नवीन शिक्षण धोरणाच्या संदर्भाने शासनाच्या बदलत्या भूमिकेचा अभ्यास करणे.
3. नवीन शिक्षण धोरणा संदर्भाने शैक्षणिक क्षेत्रातील भारताचे आंतरराष्ट्रीय स्थान तपासणे.
4. नवीन शिक्षण धोरणाच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करणे.

## IV. गृहितके

1. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे कालसुसंगत शिक्षण धोरण आहे.
2. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे शिक्षणाच्या खाजगीकरणाला प्राधान्य देते
3. नवीन शिक्षण धोरण हे ग्रामीण, आदीवासी व डोंगराळ भागासाठी नकारात्मक स्वरुपाचे आहे.
4. नवीन शिक्षण धोरणामुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेचे स्वरुप सर्वसमावेशक बनेल.

## V. संशोधन पध्दती

प्रस्तुत लेखासाठी अन्वेषणात्मक तथा वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला असून धोरणाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रातून आलेल्या प्रतिक्रिया, मान्यवर तज्ञ लोकांच्या मताचा अभ्यास केला असून मुख्यत्वे द्वितीयक स्त्रोतामध्ये उपलब्ध असलेल्या साधनांचा वापर या लेखासाठी करण्यात आला आहे. विषयाशी संबंधीत संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, टि. व्ही व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित झालेली माहिती याचा वापर यासाठी करण्यात आला आहे.

## VI. भारतातील शिक्षण धोरणांचा ऐतिहासिक आढावा

भारतात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण विषयक सुधारणा करण्याच्या अनुषंगाने अनेकदा विविध आयोग, समित्या, ठराव आणि धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. स्वातंत्र्यपूर्वकाळात इंग्रजांनी भारतात औपचारिक शिक्षणाची चौकट निर्माण केली होती तथापि तिचा हेतू वेगळा होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडात पहिल्यांदा 1968 साली पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर करण्यात आले. "यात मोफत व सक्तीचे शिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण, प्रादेशिक भाषांचा प्रभावी वापर, सर्वांना शिक्षणाची समान संधी, शिक्षणातील प्रादेशिक असमतोल दूर करणे, विज्ञान शिक्षणाला प्राधान्य देणे, विविध उपक्रम राबवणे, प्रौढ साक्षरता आदी बाबीबाबत ठराव मंजूर करण्यात आले."[2] शिक्षणाची संरचना ही 10+2+3 अशी देशभर आखण्यात आली. पुढे 1977 मध्ये इश्वरभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आढावा समिती गठीत करण्यात आली. या समितीने कामावर आधारित शिक्षणाची संकल्पना (Socially useful productive work) मांडली. यासाठी "व्यावसायिक शिक्षणावर भर देताना मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह धरला. या शिवाय संपूर्ण भारतभर शिक्षण संरचनेत एकरुपता आणण्याच्या दृष्टीने शिक्षण हा विषय राज्यसूचीतून समवर्ती सूचित समाविष्ट करण्यात आला."[3] कालांतराने 1986 साली राजीव गांधी यांच्या काळात दुसरे राष्ट्रीय शिक्षण धोरण आले. "या धोरणात प्राथमिक शिक्षणाला वैश्विक स्वरुप देताना 14 वर्षाच्या आतील सर्व बालकांना शिक्षण सक्तीचे करण्याचा प्रयत्न झाला. शिक्षणातील गुणवत्तेवर भर देताना माध्यमिक शिक्षणात संगणकीय कौशल्याचा समावेश करण्यात आला. या शिवाय शिक्षणातील विषमता दूर करुन राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहण देणाऱ्या शिक्षण धोरणाचा अवलंब, विज्ञान तंत्रज्ञानावर भर, पूर्वप्राथमिक शिक्षणाला महत्त्व आदी बाबीवर ठराव मंजूर करण्यात आले."[4] या शिक्षण धोरणाचे फलित म्हणजे खडूफळा मोहिम, नवोदय विद्यालयाची सुरुवात, मुक्त विद्यापीठांची स्थापना आदी बाबी होत.

पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात दुसऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा आढावा घेण्यासाठी आचार्य राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली 1992 साली राष्ट्रीय शिक्षण धोरण कृती आराखडा तयार करण्यात आला. "या आराखडयामध्ये शिक्षणातील पटनोंदणीवर भर देताना 14 वर्षापर्यंतच्या बालकांच्या शिक्षणावर विशेष भर देणे, शिक्षणाच्या गुणवत्तेत शाश्वत सुधारणा करणे याबाबीवर भर देण्यात आला."[5] पुढे अटलबिहारी बावजपेयी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्तेत आलेल्या आघाडी सरकारने 2002 साली 86 वी घटना दूरुस्ती करुन कलम 21 अ मध्ये 6 ते 14 वर्ष वयोगटातील बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतुद केली. या शिवाय कलम 45 नुसार 6 वर्षाच्या आतील बालकांच्या शिक्षण व शिशुकाळातील जतन करण्यासाठी तरतूद केली तर कलम 51 अ मध्ये शिशुकालीन शिक्षणाची कर्तव्ये पालकांवर टाकली. सन 2009 साली शिक्षण हक्क कायदा पास करण्यात आला आणि 6 ते 14 वर्ष वयोगटातील बालकांना प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात आले. या कायद्यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच शिक्षकांची ग्रामीण शहरी भागातील संख्यात्मक तफावत दूर करणे, शिक्षकांना निवडणूका, जनगणना अशा प्रासंगिक कामाशिवाय इतर कुठलेही काम दिले जाणार नाही आणि मुख्य म्हणजे या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय शिक्षण आयोग व राष्ट्रीय बालक संरक्षण आयोग स्थापन करण्यात आले.

## VII. नवीन शिक्षण धोरणातील ठळक बाबी

### 7.1 शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदलाची नांदी

नवीन शिक्षण धोरण हे फार मोठया प्रतिक्षेनंतर भारतात शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल करणारा मैलाचा दगड मानला जात आहे. एकंदरीत शिक्षण व्यवस्थेच्या संरचनेत बदल सूचविणारे हे पहिलेच धोरण असून शालेय शिक्षणाचा अतापर्यंतचा 10+2 हा आकृतीबंध बदलून त्याठिकाणी 5+3+3+4 अशी संरचना आखलेली आहे. विशेष म्हणजे 3 ते 5 वयोगटातील शिशुनाही या औपचारिक शिक्षणात समाविष्ट करण्यात आलेले आहे. "5+3+3+4 हा आकृतीबंध अता अनुक्रमे पायाभूत + पूर्वतयारी + मध्यम + माध्यमिक असा ओळखला जाणार आहे. या धोरणाने उच्च शिक्षणातही आमुलाग्र बदल केले आहेत. पूर्वीच्या तीन ते चार वर्षाच्या पदवी आणि दोन वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला बदलून तथा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाला सलग करत चार वर्षाचा पदवी अधिक पदव्युत्तर असा एकत्रित अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे."[6] शिवाय यात पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अशी क्रमवार रचना तयार करुन व्यावसायिक–नौकरीशी निघडीत पदवी अथवा संशोधनात्मक पदव्युत्तर अभ्यासक्रम असा पर्याय विद्यार्थ्यांपुढे ठेवण्यात आला आहे. उच्च शिक्षणातील विविध टप्यावर विद्यार्थ्यांना बाहेर (Exit) पडण्याचा पर्याय यात ठेवण्यात आला असून व्यावसायिक कौशल्य धारण करीत विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख बनवण्याचा मानस यात आहे. कुठल्याही स्थितीत विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात येता यावे व कौशल्य धारण करुन बाहेर पडता यावे यासाठी या धोरणात Multiple Entry & Exit स्वीकारले आहे.

**7.2 पूर्वप्राथमिक शिक्षणाला औपचारिक स्वरुप**

भारतात प्राथमिक शिक्षणाचा वयोगट 6 ते 14 होता; तो अता नव्या शिक्षण धोरणाने 3 ते 18 असा होणार आहे. नवीन शिक्षणाच्या आकृतीबंधामध्ये (5+3+3+4) यामधील पहिले पाच वर्ष हे वयवर्ष 3 पासून चालू होणार असून ज्याचा समावेश पूर्वप्राथमिक अर्थात आंगणवाडी ते वर्ग 2 असा राहणार आहे. शिशु वयात बालकांच्या मेंदूचा 85 टक्के विकास होत असतो त्यामुळे बालसंस्कार आणि अक्षर व अंक ओळख करुन देऊन प्राथमिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना तयार करणे हे या सरंचनात्मक बदलाचा मुख्य हेतू असल्याचे दिसते. या धोरणात्मक निर्णयाने अता पूर्वप्राथमिक शिक्षणाला औपचारीक स्वरुप प्राप्त होणार आहे. या धोरणात्मक बदलाने अता बालकांचे मोफत आणि स्क्तीचे शिक्षण हक्क कायद्यात बदल करुन आंगणवाडीचे अर्थात पूर्वप्राथमिक शिक्षण हे या काय़द्यात अंर्तभूत करावे लागणार आहे.

पूर्वप्राथमिक म्हणजेच आंगणवाडी स्तरावरील शिक्षणाला औपचारीक स्वरुप देताना या व्यवस्थेत फार मोठया प्रमाणात बदल करावे लागणारे आहेत. पायाभूत सुविधा, पाठयक्रमाची मातृभाषेतून रचना, प्रशिक्षित शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग या बाबतीत शासनाला विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत.

**7.3 तणावमूक्त आणि स्वछंदी शिक्षण**

नवीन शिक्षण धोरणातील बदलता आकृतीबंध, मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य, प्रत्येक टप्यावर व्यावसायिक कौशल्याशी निघडीत अभ्यासक्रम, पदविका, पदवी, पदव्युत्तर आणि संशोधनात्मक पदवी या प्रत्येक टप्यावर विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख कौशल्य प्राप्त करुन बाहेर पडण्याची संधी, प्रत्येक अभ्यासक्रमाला रोजगारभिमुख बनवण्याचा प्रयत्न आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बोर्ड परीक्षांचे महत्त्व कमी करणे या सर्व बाबीमुळे प्राथमिक ते उच्च शिक्षण हे रंजक आणि तणावमूक्त स्वरुपाचे होणार आहे.

या धोरणानुसार इयत्ता पाचवी पर्यंतचे शिक्षण हे मातृभाषेतून दिले जाणार आहे. शिवाय औपचारीक शिक्षणाची सुरुवात पूर्वप्राथमिकपासूनच होणार असल्यामुळे शाळेविषयी विद्यार्थ्यांमध्ये आत्मियता निर्माण होऊ शकते. विद्यार्थ्यांवर बालवयात इंग्रजीचे दडपण राहणार नाही त्यामुळे विद्यार्थ्यांचा निकोप आणि नैसर्गिकरित्या विकास होऊ शकेल. वर्तमान शिक्षण व्यवस्थेतील बोर्ड परीक्षा या विद्यार्थ्यांचा मानसिक ताण वाढवताना दिसतात. त्यामुळे अनेकदा विद्यार्थी आत्महत्येसारख्या मार्गाचाही अवलंब करतात. त्यामुळे या धोरणात बोर्ड परीक्षांचे महत्त्व कमी केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षांविषयी असलेली भीती दूर करता येऊ शकेल. या धोरणानुसार माध्यमिक शिक्षणापासूनच व्यावसायिक कौशल्यावर अभ्यासक्रम तयार केला जाणार आहे. शिवाय उच्च शिक्षणाचा सर्व प्रकारचा अभ्यासक्रम रोजगारभिमुख असणार आहे त्यामुळे शिक्षण घेवूनही नौकरी अथवा व्यावसायाची संधी नसल्यामुळे येणारी निराशा यातून दूर करता येऊ शकेल. या धोरणाने आणखी एक महत्त्वाचा सकारात्मक परिणाम दिसून येतो तो म्हणजे वैद्यकीय आणि अभियांत्रिकीसारख्या तत्सम अभ्यासक्रमासाठी चाललेली जीवघेणी तीव्र स्पर्धा कमी होऊ शकते कारण सर्वच प्रकारचा अभ्यासक्रम हा रोजगारभिमुख असणार असल्यामुळे शिक्षणासोबतच भविष्यातील रोजगाराची काळजी काही प्रमाणात का होईना कमी होऊ शकेल. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याविषयी पालकांना वाटणारी चिंता कमी होऊ शकेल. एकंदरीत नवीन शिक्षण धोरणानुसार शिक्षण हे मनोरंजक आणि तणावमूक्त होण्यास मदत होणार आहे.

**7.4 संशोधनास चालना देणारे धोरण**

या धोरणात उच्च शिक्षण संस्थांचे संशोधनात्मक वि़द्यापीठे, अध्यापन विद्यापीठे आणि स्वायत्त शिक्षण संस्था असे तीन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे. खरेतर अध्यापनाबरोबरच संशोधन हा उच्च शिक्षण संस्थाचा अविभाज्य घटक असतो, नव्हे असायला पाहिजे. शिक्षणाचे रुपांतर संशोधनात होत असेल तरच खऱ्या अर्थाने शिक्षणाला अर्थ प्राप्त होत असतो. उच्च शिक्षण क्षेत्रात नवनवीन शोध आणि संशोधन होऊन त्याचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी व्हावा ही समाजाची किमान अपेक्षा योग्य आणि साधार आहे. AISHE 2018-19 नुसार "भारतात पीएच.डी. व तत्सम संशोधनास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ही केवळ 169170 एवढी आहे. देशातील उच्च शिक्षणातील एकून प्रवेशापैकी हे प्रमाण 0.5 टक्के पेक्षाही कमी आहे."[7] पदवी आणि पदव्युत्तर प्रवेशातील कला आणि मानव्यविद्याशाखेचे नोंदणीचे प्रमाण हे सर्वाधिक असते परंतु पीएच. डी. साठी प्रवेश घेतलेल्या एकून विद्यार्थ्यांपैकी बहुतांश संख्या ही विज्ञान आणि अभियांत्रिकी शाखेची राहिलेली दिसते. या स्थितीला अनेक कारणे जबाबदार आहेत तथापि भविष्यात ही उणीव भरुन काढण्याच्या दृष्टीने या धोरणात पुढाकार घेण्यात आला आहे. भारतात संशोधनाला चालना देण्यासाठी नॅशलन रिसर्च फाऊंडेशनची स्थापना केली जाणार आहे. शिवाय विदेशातील उच्च मानांकित 100 विद्यापीठांना भारतात कॅम्पस उघडण्याची परवानगी देण्यात येणार आहे. त्याचा हेतू मुख्यत्वे दर्जेदार शिक्षणाबरोबर संशोधनास चालना देता यावा हा आहे. या धोरणात परदेशातील अनेक उच्च शिक्षण संस्था आणि संशोधन संस्था यांच्या बरोबर देशातील उच्च शिक्षण संस्थांना सामंजस्य करार (MoU) करुन परस्पर सहकार्याने संशोधनात्मक प्रकल्प राबविता यावेत यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. उच्च शिक्षणातील 4 वर्षीय एकत्रित पदवी–पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा आकृतीबंध यामध्ये शिक्षणासोबतच संशोधनाचा केलेला समावेश याचेच द्योतक आहे. उच्च शिक्षण संस्थातील दर्जेदार अध्यापनाबरोबरच दर्जेदार संशोधनाला प्राधान्य देण्यासाठी पायाभूत सुविधा आणि सुयोग्य वातवरण निर्मितीची गरज आहे. यासाठी या धोरणात उच्च शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाचे प्रमाण सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GDP) 6 टक्के करण्याची शिफारस आहे. वास्तविक 1968 आणि 1986 या अगोदरच्या दोन्ही शिक्षण धोरणात ही शिफारस होती परंतु अजूनही खर्चाचे हे प्रमाण 4.43 टक्केच्या आसपास आहे. Economic Survey of India 2017-18 नुसार विकसित आणि विकसनशील देशातील शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाच्या प्रमाणात आपल्या देशातील शिक्षणावरील खर्च आणि गुंतवणूक ही फारच कमी आहे. प्रगत देशात ज्या पध्दतीने संशोधनाला प्राधान्य दिले जाते त्या प्रमाणात भारतात संशोधनाचा विचार गांभिर्याने घेतला जात नाही. "संशोधन व नाविण्यपूर्ण बाबीसाठी अमेरिका सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या 2.8 टक्के, दक्षिण कोरिया 4.2 टक्के, तर इस्त्रालय 4.3 टक्के खर्च करते. तर हा खर्च भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ 0.69 टक्के एवढा आहे."[8] एकंदरीत या नवीन शिक्षण धोरणात संशोधनाला दिलेले महत्त्व आणि भर उच्च शिक्षणासाठी उत्साहवर्धक आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात यामुळे संशोधकीय वृत्तीचा व संशोधन कार्यात वाढ झाल्यास त्याचा फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला होऊ शकतो.

**7.5 प्रादेशिक भाषांना अधिक महत्त्व**

नवीन शिक्षण धोरणात शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह धरला असून बालकांच्या निकोप, नैसर्गिक वाढीसाठी व विकासासाठी मातृभाषेतून शिक्षणाला अधिक प्राधान्य देणे वाजवी आहे. भारतात शिक्षण मातृभाषेतून बंधनकारक करीत असताना यामध्ये एक विरोधाभासही निर्माण होताना दिसून येतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर इंग्रजीचे महत्त्व वादातीत आहे. जगाशी स्पर्धा करताना इंग्रजीला आजतरी पर्याय आहे असे दिसत नाही. तथापि अनेक देशात वैद्यकीय क्षेत्रातील शिक्षण सुध्दा तेथील प्रादेशिक अथवा मातृभाषेतून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु भारतात या दृष्टीने अनेक मर्यादा येण्याची शक्यता आहे. भाषिक समृध्दता तथा भाषिक अस्मिता हा मुध्दा जरी महत्त्वाचा असला तरी मातृभाषेतून शिक्षणाचा दूराग्रह धरणे किती फायदाचे ठरेल हे येणारा काळच ठरवेल. कारण प्राथमिक शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह हा जरी योग्य असला तरी एकंदरीत शिक्षणासाठी मातृभाषा अथवा प्रादेशिक भाषेचा आग्रह धरण्यापूर्वी ती भाषा ज्ञानभाषा होणे ही पूर्वअट आहे. अभियांत्रिकी, कृषी, वैद्यकीय आदी क्षेत्रातील पाठयक्रम भारतातील प्रादेशिक भाषेतून मांडताना पारिभषिक शब्द, संज्ञा, पर्यायी शब्दभांडार यांची

अडचण येऊ शकते. त्यामुळे भारतातील अनेक प्रादेशिक भाषांमध्ये अशा विविध क्षेत्रातील पाठ्यक्रमिक रचना करणे हे अलिकडच्या काळात शक्य वाटत नाही. तरी परंतु भारतातील प्रादेशिक भाषांना या निमित्ताने त्यांचा स्तर उंचावण्यासाठी या धोरणाने नवीन जबाबदारी आणि संधी निर्माण करुन दिली आहे.

### 7.6 आंतरविद्याशाखीय दृष्टीकोण

नवीन शिक्षण धोरणाचे प्रमुख वैशिष्टये म्हणजे यात आंतरविद्याशाखीय शिक्षणावर अधिक भर देण्यात आला आहे. आतापर्यंत भारतीय शिक्षण व्यवस्थेत विशेषतः उच्च शिक्षणात असलेली कला, वाणिज्य, विज्ञान असे वर्गीकरण संपुष्टात आणून विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार विषयांची निवड करता येणार आहे. इंजिनेरिंग, मॅनेजमेंट, वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कला, इतिहास, संस्कृती, राज्यव्यवस्था, प्रशासन, अर्थशास्त्र, मानसशास्त्र अशा स्वरुपाचे इतर समांतर विषय घेवून पदवी पूर्ण करता येईल. त्याचबरोबर सामाजिक शास्त्र, भाषा, इतिहास, संस्कृती आदी शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना विज्ञान, अवकाश शास्त्र, भौतिकशास्त्र, वैद्यकीय शास्त्र, हवामान, तंत्रज्ञान इत्यादी विषयांची ओळख होईल. याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांचा दृष्टीकोण सर्वसमावेशक होण्याबरोबरच त्यांच्या जाणीवासुध्दा समृध्द होतील. शिवाय याचा फायदा भारताबाहेर शिक्षण व व्यवासायासाठी गेलेले आणि बाहेर देशातून भारतात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून भारताच्या संस्कृतिक इतिहास, मूल्य यांची ओळख जगाला होईल. अंतिमतः याचा फायदा आंतरराष्ट्रीय स्तरावरील देशाचे संबंध सुधारण्यातही होऊ शकतो. आंतरविद्याशाखीय शिक्षणासाठी एकाच छताखाली अनेक विषय, विद्याशाखा आणि अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षण संस्थांची निर्मिती तथा पूर्नरचना करावी लागणार आहे. अर्थात त्यासाठी या धोरणात लहान शिक्षण संस्थांचे एकत्रीकरण करण्याची तरतूद आहे. "देशातील एकूण महाविद्यालयापैकी 34.8 टक्के महाविद्यालये ही एकल विद्याशाखा असलेली आहेत."[9] त्यामुळे अशा स्थितीत या शिक्षण संस्थांचे एकत्रीकरण करणे कठीण आणि काही बाबतीत अव्यहार्य सुध्दा वाटते.

### 7.7 व्यावसायिक आणि रोजगारभिमुख शिक्षणावर भर

"12 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये (2012–17) भारतात 19 ते 24 या वयोगटातील केवळ 5 टक्के विद्यार्थ्यांनाच व्यावसायिक शिक्षण प्राप्त होऊ शकले. परंतु व्यावसायिक शिक्षण प्राप्त होण्याचे हे प्रमाण अमेरिकेत 52, जर्मनीमध्ये 75 तर दक्षिण कोरियामध्ये तब्बल 96 टक्के एवढे आहे."[10] आत्मनिर्भर भारतासाठी हे प्रमाण निराशादायक असून येणाऱ्या काळामध्ये शिक्षणातून रोजगारभिमुख कौशल्य प्राप्त व्हावेत व विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक वृत्ती जोपासली जावी हा या नवीन शिक्षण धोरणाचा मुख्य भर आहे. भारतातील शिक्षणातील गळतीच्या अनेक कारणांपैकी एक मुख्य कारण म्हणजे व्यावसायभिमुख शिक्षणाची कमतरता ही होय. त्यामुळे या धोरणात माध्यमिक शिक्षणापासूनच व्यावसायिक शिक्षणाची सांगड घातली जाणार आहे.

भारतातील एकूण लोकसंख्येतील एक मोठा घटक हा कार्यकारी लोकसंख्येचा आहे. (वयोगट 15–35) या कर्त्या व सक्षम लोकसंख्येला कौशल्य प्रदान करुन तथा रोजगार देऊन त्यांचे देशातील विकासातील योगदान वाढवता येऊ शकते. शिवाय या गटातील लोकसंख्येला रोजगार देणे हे देशाच्या आणि समाजाच्या स्वाथ्याच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरते. भविष्यात भारताला जागतिक महासत्ता बनवण्यामध्ये या गटातील लोकांचे कौशल्य आधारित श्रम महत्त्वाचे आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात व्यावसायिक शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व असणार आहे. ही गरज लक्षात घेऊन या धोरणात व्यावसायिक शिक्षणाला दिलेले प्राधान्य प्रासंगिक आहे.

### 7.8 ऑनलाईन आणि डिजीटल शिक्षण

कोरोना रोगाच्या प्रादूर्भावाने जगातील अनेक देशातील व्यवस्थेपुढे विविध आव्हाने आणि समस्या निर्माण केलेल्या आहेत. मागील वर्षभरापासून मानवी जीवनातील सर्व क्षेत्रावर त्याचा दूरगामी परिणाम झाला असून शिक्षण क्षेत्रही त्यास अपवाद राहिलेले नाही. या पार्श्वभूमीवर नवीन शिक्षण धोरणानेही त्याची दखल घेतली असून येणाऱ्या काळात या निमित्ताने शिक्षण क्षेत्रासमोर कोणती आव्हाने निर्माण होणार आहेत आणि त्यातून मार्ग कसे काढता येतील याचीही चर्चा या धोरणात केली गेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून या धोरणात ऑनलाईन शिक्षण, डीजीटल पायाभूत सुविधा, व्हर्च्युअल लॅब, ऑनलॉईन परीक्षा व मूल्यमापन, ऑनलाईन शिक्षणासाठी सामग्री आणि व्यासपिठ इत्यादी बाबींचा यामध्ये विचार करण्यात आला आहे. येणाऱ्या काळात ऑनलाईन शिक्षणासाठी SWAYAM, IGNOU Channals, DIKSHA, SWAYAMPRANHA, ही प्लेटफॉर्म त्यासाठी कार्य करतील. या शिवाय टि. व्ही. वाहिनीवरील विविध शिक्षण वाहिन्या ही जबाबदारी पार पाडतील असा विश्वास यामध्ये व्यक्त करण्यात आला आहे. दूर्गम, ग्रामीण आणि दूरस्थ क्षेत्रामध्ये ही ऑनलाईन शिक्षण प्रणाली उपयोगी पडणार नाही त्यामुळे समाजातील काही घटक यापासून वंचित राहिल अशी भीती तज्ञाकडून व्यक्त केली जात आहे परंतु संपूर्ण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी 2040 पर्यंतचा वेळ असल्यामुळे ही भीती निराधार वाटते. भारतातील या क्षेत्रातील वर्तमान प्रगती पाहता दूर्गम व दूरस्थ क्षेत्रापर्यंत येणाऱ्या पाच–दहा वर्षात इंटरनेट आणि इतर अनुषंगिक सुविधा पोहचेल याचा विश्वास वाटतो.

### 7.9 शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण

नवीन शिक्षण धोरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भारतीय शिक्षण आणि शिक्षण व्यवस्थेचे आंतरराष्ट्रीयकरण होय. खरेतर भारताचा या संदर्भाने अतिशय दैदिप्यमान इतिहास राहिलेला आहे. प्राचीन काळातील नालंदा, तक्षशिला ही विद्यापीठे या इतिहासाची साक्ष आहेत. या धोरणात या ऐतिहासिक संदर्भाचा आवर्जून उल्लेख करताना भारताला उच्च शिक्षणाचे जागतिक केंद्र बनविण्याचा मानस या धोरणात आहे. धोरणपूर्व काळातच 'स्टडी इन इंडीया' या योजनेअंतर्गत भारतातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न चालू झालेला आहे. या धोरणाच्या निमित्ताने परदेशी विद्यार्थ्यांना विद्यार्जनासाठी शिष्यवृत्ती देणे, भारतीय भाषा, कला, संगित, साहित्य, संस्कृती, योग, आर्युवेद, इतिहास आदी विषयात अभ्यास व संशोधनासाठी प्रोत्साहीत करणे ही कार्य चालूच आहेत. तथापि या नवीन शिक्षण धोरणात परदेशातील उच्च मानांकीत 100 विद्यापीठांना भारतात आपली कॅम्पस उघडण्यासाठी परवानगी व प्रोत्साहण देणे आणि त्यासाठी प्रयत्न करण्याची तरतूद आहे. खरेतर या परदेशी विद्यापीठे अथवा संस्थांचा भारतातील प्रवेश आणि त्याचा परिणाम याची सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही दृष्टीने चर्चा होताना दिसून येत आहे.

संशोधन आणि अध्यापनाच्या अनुषंगाने भारतातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यमापन केले असता "जगातील उत्कृष्ठ 100 उच्च शिक्षण संस्थामध्ये भारतातील एकही संस्था नसणे ही खेदाची बाब आहे. जगातील पहिल्या 200 मध्ये केवळ 3 तर 500 उच्च शिक्षण संस्थामध्ये भारतातील केवळ 8 संस्थांचा समावेश होतो."[11] भारतात संशोधनाच्या अनुषंगाने उदासिन स्थिती आहे.

AISHE 2018-19 नुसार "जगातील 164 देशातून केवळ 47427 विद्यार्थी शिक्षणासाठी भारतात आले आहेत. परदेशी विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या ही नेपाळ आणि भारताच्या शेजारील राष्ट्रांची आहे."[12] याचा अर्थ युरोपमधील प्रगत देशातील विद्यार्थ्यांना भारतीय शिक्षण हे आजूनही आकृष्ट करीत नाही.

### 7.10 उच्च शिक्षण व्यवस्थेची स्वायत्तेकडे वाटचाल

या धोरणाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे स्वायत्ता. उच्च शिक्षण संस्थाना संलग्नतेडून स्वायत्तेकडे नेणाऱ्या धोरणात विद्यापीठावरील संलग्न संस्थाचा भार कमी करुन येणाऱ्या पंधरा

International Journal of Engineering, Management and Humanities (IJEMH)
Volume 2, Issue 2, pp: 90-95 www.ijemh.com

वर्षात सर्व उच्च शिक्षण संस्थांना स्वायत्ता देण्याचा मानस यामध्ये आहे. उच्च शिक्षण संस्थांना स्वतःचा अभ्यासक्रम ठरविणे, नवीन विषय आणि अभ्यासक्रम बनविणे, परीक्षा घेणे, निकाल देणे, स्वतःचे ॲकेडेमिक कॅलेंडर तयार करुन ते अंमलात आणणे या स्वरुपाचे स्वातंत्र्य मिळणार आहे. या स्वरुपाच्या स्वायत्तेमुळे उच्च शिक्षण संस्थांना स्थानिक परिस्थिती आणि प्रादेशिक मूल्यांचा विचार करुन स्वतःची अध्यापन पध्दती विकसित करता येऊ शकते. स्थानिक गरजा आणि आवश्यकता यांचा विचार करुन कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम निश्चित करता येईल; ज्यामुळे अभ्यासक्रमात विविधतेसह तो रोजगारभिमूख होईल ही अपेक्षा यामध्ये दिसून येते. उदा. पर्यटन क्षेत्रातील उच्च शिक्षण संस्थांना पर्यटनावर आधारित अभ्यासक्रम तयार करुन पर्यटनाला चालना देतानाच विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण देता येईल. स्वायत्तेचा हेतू हा जरी खूप चांगला असला तरी प्राप्त परिस्थितीमध्ये यामध्ये अडचणी बऱ्याच प्रमाणात आहेत. स्वायत्ता यामध्ये अभ्यासक्रमाच्या स्वायत्तेसह आर्थिक स्वायत्ता हा कळीचा मुध्दा असणार आहे. अशा स्वायत्त शिक्षण संस्थांना स्वतःचे भांडवल, पायाभूत सुविधा आणि संसाधनाची उभारणी करावी लागणार आहे. शिवाय शिक्षण शुल्क आकारुन अभ्यासक्रम चालवावे लागणार आहेत. या संस्थांना भविष्यात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी लागणाऱ्या संसाधनासाठी विविध पर्यायी मार्गाचा शोध घ्यावा लागणार आहे. परंतु भारतातील आजच्या परिस्थितीचे अवलोकन केले असता हा कोणताही पर्याय पूर्णतः व्यवहार्य वाटत नाही. आर्थिक आणि सामाजिक विषमतेमध्ये सर्वांना शिक्षण शुल्क भरुन शिक्षण घेणे शक्य होणार नाही. शिवाय ग्रामीण, आदीवासी आणि डोंगराळ भागातील शिक्षण संस्थांना अशा प्रकारे संसाधने उभे करणे नजिकच्या काळात तरी शक्य होणार नाही. त्यामुळे याचा परिणाम त्या भागातील विद्यार्थी आणि शिक्षण संस्था या दोघांवरही होणार आहे. ग्रामीण आदीवासी आणि डोंगराळ भागातील सध्या अस्तित्वात असलेल्या बहुतांश शिक्षण संस्था या पारंपारिक स्वरुपाचा कला वाणिज्य विज्ञान असा अभ्यासक्रम चालवतात.

### 7.11 शिक्षण संस्थांची पूर्नरचना किंवा एकत्रीकरण

या धोरणात 3000 पेक्षा कमी विद्यार्थीसंख्या असणाऱ्या उच्च शिक्षण संस्था बंद करणे तथा अशा कमी विद्यार्थी संख्या असणाऱ्या शिक्षण संस्थाचे क्लबिंग करुन मोठ्या संस्थेत रुपांतर करणे यावर विशेष भर दिला आहे. आंतरविद्याशाखीय शिक्षण प्रणालीसाठी एकल विद्याशाखीय उच्च शिक्षण संस्थांचे रुपांतर बहुशाखीय करणे आवश्यक आहे. परंतु भारतातील कमी विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयांची संख्या बहुतांश आहे. "भारतातील 16.3 टक्के महाविद्यालये ही केवळ 100 विद्यार्थी संख्या असलेले आहेत तर 100 ते 500 विद्यार्थीसंख्या असणाऱ्या महाविद्यालयाचे प्रमाण 48.1 टक्के एवढे आहे. याचा अर्थ तब्बल 64.4 टक्के महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश 500 च्या आतच आहे. देशातील केवळ 3 टक्के उच्च शिक्षण संस्थामध्ये 3000 च्यावर विद्याथी संख्या आहे."[13] कमी प्रवेश असणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांचे एकत्रीकरण करताना सर्वात मोठी अडचण आहे ती ग्रामीण भागातील महाविद्यालयांची. ग्रामीण भागात उच्च शिक्षण संस्थाचे एकत्रीकरण करताना वाढणाऱ्या भौगोलिक अंतरामुळे तेथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण नाकारल्यासारखे होईल. शिक्षण संस्थांचे एकत्रीकरण तथा बहुशाखीय करताना तालुका हा घटक केंद्रबिंदु मानला तरी तालुक्यापासून दूर असणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींसाठी हे गैरसोयीचे होऊ शकते.

### 7.12 उच्च शिक्षण व्यवस्थेचे नियंत्रण आणि नियमन

भारतात उच्च शिक्षण व्यवस्थेचे नियमन तथा नियंत्रण करण्यासाठी मानव संसाधन विकास मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषद, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद इत्यादी अनेक यंत्रणा कार्यरत होत्या तथापि नवीन शिक्षण धोरणात या जून्या यंत्रणांची पूर्नरचना करुन नियमन, अधिमान्यता, अनुदान आणि शैक्षणिक मानांकन या चार बाबीसाठी चार संस्था निर्माण करुन त्या सर्व एकाच छताखाली भारतीय उच्च शिक्षण आयोग (HECI) यांच्या नियंत्रणाखाली आणल्या जातील. या आयोगाच्या नियंत्रणाखाली राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद, (NHERC), राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (NAC), उच्च शिक्षण अनुदान परिषद (HEGC), सामान्य शिक्षण परिषद (GEC) या चार संस्था निर्माण करण्यात येतील. सामान्य शिक्षण परिषदे अंतर्गत राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता संरचना (NHEQF) आणि राष्ट्रीय कौशल्य पात्रता संरचना (NHEQF) या दोन यंत्रणा निर्माण करुन त्यांच्याकडे अनुक्रमे उच शिक्षणातील पदवी, पदविका, पदव्युत्तर, प्रमाणपत्र अभ्यासक्रम यांची आखणी, मांडणी, पात्रता निर्धारण करण्याची आणि उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात व्यावसायिक कौशल्यांचा समावेश करण्याची तथा व्यावसायिक शिक्षण आणि उच्च शिक्षण यांचे एकत्रीकरण करण्याची जबाबदारी सोपवली जाणार आहे. या शिवाय ICAR, VCI, NCTE, CoA, NCVRT या सर्व संस्थांना सामान्य शिक्षण परिषदेवर (GEC) सदस्यत्व दिले जाईल. ज्यामुळे सर्व उच्च शिक्षणात एकरुपता आणि सर्वसमावेशकता येईल.

### 7.13 शिक्षणाचे व्यापारीकरण होण्याची शक्यता

या शिक्षण धोरणातील उच्च शिक्षण संस्थाना (शैक्षणिक आणि आर्थिक) स्वायत्ता देण्याचे धोरण, परदेशी 100 विद्यापीठांना भारतात दिला जाणारा प्रवेश, कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शिक्षण संस्थांची पूर्नरचना तथा एकत्रीकरण आणि शिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण व डीजीटायजेशन या शिफारशी जशा सकारात्मक स्वरुपाच्या वाटत आहेत. तसेच त्यातून अनेक समस्या आणि धोके निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या शिक्षण धोरणाने जी लक्ष्य आणि उदिष्ट्ये निश्चित केली आहेत; ती पूर्ण करण्यासाठी शिक्षण क्षेत्रात मोठया गुंतवणूकीची गरज आहे. तथापि वर्तमान सरकारचे खाजगीकरण व निर्गुंतवणूकीसंबंधीचे धोरण लक्षात घेता या क्षेत्रात लागणाऱ्या पायाभूत सुविधा आणि संसाधनाच्या उभारणीसाठी खाजगी क्षेत्राची मदत घेण्याची मोठी शक्यता दिसत आहे. तसेच मानव संसाधन विकास मंत्री श्री प्रकाश जावडेकर यांनी, "शैक्षणिक संस्थांनी माजी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मागवून संस्था पुढे न्यावी, सरकारच्या मदतीवर आता जास्त अवलंबून राहता कामा नये" असे म्हटले आहे. त्यामुळे भविष्यात शिक्षण व शिक्षण व्यवस्था स्वंयअर्थसाहय्यीत खाजगी शिक्षण संस्थाकडे वर्ग झाले तर नवल वाटू नये. या धोरणात उच्च शिक्षण संस्थाचे सलंग्नीकरण पुढील पंधरा वर्षात हळूहळू संपुष्टात आणून त्यांना अकॅडेमिक आणि आर्थिक स्वायत्ता दिली जाणार आहे. शैक्षणिक स्वायत्तेमुळे शिक्षण संस्थांचा विद्यापीठावरील भार कमी होईल परंतु आर्थिक स्वायत्तेमुळे शिक्षण संस्थांना भरमसाठ शुल्क वाढीचा परवानाच मिळू शकेल. शिवाय कला, संस्कृती, भाषासह मानव्यविद्याशाखेतील अनेक विषयांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. कारण नवीन धोरणात जरी प्रत्येक विषय आणि विद्याशाखेला व्यावसायिक कौशल्याशी जोडले जाणार असले तरी या विद्याशाखांमधून उपयोजित कौशल्य प्राप्त झाली तरी बाजारात त्यांचे मूल्य किती राहिल आणि त्या आधारे शाश्वत व्यवसायाची हमी देता येईल असे वाटत नाही. दुसऱ्या बाजूला खाजगी क्षेत्राच्या अधिन असलेले वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखे व्यावसायिक शिक्षण महाग होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा स्थितीत या धोरणात शिक्षणाच्या सर्वसमावेशकतेचे उद्दिष्ट कसे पूर्ण करता येईल? हे अनुत्तरीत आहे.

या शिक्षण धोरणात शिक्षणाच्या व्यापारीकरणावर आळा घालण्यासाठी सत्ता आणि संतूलनाच्या तत्वानुसार अनेक यंत्रणा निर्माण करण्यात येणार असून ना नफा या तत्वावर उच्च शिक्षण संस्थांचे नियमित लेखापरीक्षण आणि मानांकनाच्या आधारे मूल्यांकन केले जाणार आहे. नॅकच्याद्वारे या संस्थांचे मूल्यांकन करण्याबरोबरच राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषदेद्वारे या संस्थांवर नियंत्रण ठेवले जाणार आहे. तथापि ही सर्व नवीन व्यवस्था आणि यंत्रणा कितपत यशस्वी होतील हे येणारा काळच सांगू शकेल.

## VIII. समारोप

21 व्या शतकात भारताचे जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न शिक्षण विषयक सुधारणांना अपवाद करुन पूर्ण होऊ शकत नाहीत. वास्तविक शिक्षण क्षेत्रातील सुधारणांसाठी एक दशक पूर्वीच धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित होते तथापि उशिरा का होईना (34 वर्षांनंतर) सर्वसमावेशक बदल या धोरणाने करण्यात आला आहे. उच्च शिक्षणातील नोंदणीचे प्रमाण जे सध्या 26 टक्के आहे ते 2035 पर्यंत 50 टक्के करण्याचे उद्दिष्ट या धोरणात आहे. परंतु उच्च शिक्षण संस्थांतील शिक्षक व इतर पदांची भरती मागील बऱ्याच काळापासून झाली नाही. शिक्षणावरील अर्थसंकल्पातील तरतूद वाढविण्याची शिफारस नवीन शिक्षण धोरणात केली असतानाही धोरणाला मान्यता दिलेल्या चालू आर्थिक वर्षातच (2021–22) मागील वर्षाच्या तुलनेत लक्षणिय कपात केंद्र आणि महाराष्ट्र सरकारनेही केलेली आहे. भविष्यातील सर्वात मोठा प्रश्न रोजगाराचा असणार आहे. या नवीन शिक्षण धोरणाची सर्वात मोठी प्रेरणा ही रोजगारक्षम शिक्षणाची असल्याची दिसते परंतु भारताच्या वर्तमान लोकसंख्या वृध्दीचा दर पाहता भविष्यात भारतीय अर्थव्यवस्थेपुढे बेरोजगारीची मोठी समस्या निर्माण होऊ शकेल असे दिसते. देशातील सर्व कर्त्या लोकसंख्येला केवळ उद्योग क्षेत्रातून रोजगार देणे शक्य होईल असे वाटत नाही; अशा परिस्थितीत ही क्षमता भारतातील कृषी क्षेत्रात आहे. परंतु पारंपारिक स्वरुपाच्या भारतीय शेतीपध्दतीतून ही गरज भागणार नाही. कृषी क्षेत्रातील सुधारणांना आणखी बराच वाव आहे. कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा विकास, हेक्टरी उत्पादन क्षमता वाढवणे याबरोबरच शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. मुख्य म्हणजे कृषी शिक्षण व तंत्रज्ञानात संशोधन आणि विस्तार होणे अपेक्षित आहे. या शिवाय शेतीपूरक व्यवसायाचा विकास करुन रोजगार प्राप्त करुन देणे महत्त्वाचे ठरते. भारतातील वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्याची क्षमता ही भारतीय शेतीमध्ये अजूनही निर्माण करता येऊ शकेल; परंतु त्या दृष्टीने या क्षेत्राचा विकास आणि विस्तार होणे ही काळाची गरज आहे. "भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेतील विद्यापीठांपैकी कृषी विद्यापीठाचे प्रमाण हे 9 टक्के तर विद्यार्थी पटनोंदणीचे प्रमाण केवळ 1 टक्का एवढे आहे."[14]

"भारत स्वतंत्र झाला त्यावेळी देशात 20 विद्यापीठे आणि 500 महाविद्यालये होती. आज 993 विद्यापीठे आणि 39931 महाविद्यालये आहेत. परंतु अजूनही उच्च शिक्षणातील पट नोंदणीचे प्रमाण 28 टक्केच्या वर गेले नाही."[15] स्वातंत्र्योत्तर भारतात उच्च शिक्षण संस्थांचा विस्तार झाला परंतु अपेक्षित उद्दिष्टं गाठता आले नाही हे मान्य करावे लागेल. अशा स्थितीत कमी पटसंख्या असलेल्या, लहान आकाराच्या शिक्षण संस्थांची पूर्नरचना तथा एकीकरण करुन शिक्षणाचे केंद्रीकरण करणे कितपत योग्य राहिल हे या धोरणाच्या निमित्ताने प्रश्न निर्माण होतो. पायाभूत सुविधा आणि संसाधनाचा महत्तम विनियोग आणि वापर हे या केंद्रीकरणाचे उद्दिष्टं सांगण्यात आले आहे. परंतु भारत हा अजूनही खेड्याचा देश म्हणून ओळखला जातो. दुर्गम व डोंगराळ भागात शिक्षणाचे विकेंद्रीकरण करुन वाडी–तांडयापर्यंत शिक्षण पोहचवणे अजूनही गरजेचे आहे. शिक्षण ही विकण्याची वस्तु नसून ती राज्याची जबाबदारी आहे. अशा स्थितीत या धोरणाच्या निमित्ताने ही पळवाट योग्य वाटत नाही.

नवीन शिक्षण धोरणाच्या निमित्ताने सरकारकडून फार मोठी अपेक्षा समाजातील शिक्षक, पालक, विद्यार्थी, संशोधक, उद्योजक आदी सर्व घटकांची आहे. धोरणात अपेक्षा केल्याप्रमाणे भारतीय भाषा, संस्कृती, मूल्ये, विचारधारा यांच्या पूर्नरुथानाबरोबरच कृषी, खगोल, अवकाश विज्ञान, अणुउर्जा, जैवतंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीयशास्त्र इत्यादी क्षेत्रातील शिक्षण आणि संशोधनाला चालना मिळावी ही अपेक्षा आहे. या क्षेत्रातील शिक्षणाचा विस्तार आणि त्यास अग्रक्रम दिल्याशिवाय भारतीय शिक्षण व्यवस्था ही खऱ्या अर्थाने अधुनिक आणि आंतरराष्ट्रीय होऊ शकणार नाही. या धोरणातील रचनात्मक बदलास मूर्त रुप देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारे, शिक्षण क्षेत्रातील सर्व यंत्रणा व अभिकरणे, शिक्षण तज्ञ, शिक्षक, पालक, समाज या सर्व घटकांची सामायिक जबाबदारी आहे. वास्तविक या धोरणात अशा स्वरुपाच्या काही उणीवा आढळून येत असल्या तरी भारतीय शिक्षण व्यवस्थेविषयी सर्वसमावेशक विचार करणारे हे पहिलेच धोरण असून अनेक नवीन बदलांची नांदी या धोरणाने होणार आहे. शिक्षण व्यवस्थेतील काही क्षेत्रात निर्माण झालेल्या मरगळीला हे धोरण कडू चवीच्या औषधाप्रमाणे गुणकारी ठरेल असा विश्वास वाटतो. त्यामुळे आवश्यक ती लवचिकता बाळगळत येणाऱ्या काळात गरजेनुसार त्यात सकारात्मक बदल करुन हे धोरण पूर्ण क्षमतेने राबवावे ही समाजाची अपेक्षा आहे.

### संदर्भ

[1]. फुले ज्योतिराव 1883, शेतकऱ्यांचा असूड, (उपोद्घात), सनय प्रकाशन, पुणे, पृ. क्र. 7

[2].https://www.mpscacademy.com/2017/07/national-education-commissions-part2html#

[3].https://www.mpscacademy.com/2017/07/national-education-commissions-part2html#

[4].https://www.mpscacademy.com/2017/07/national-education-commissions-part2html#

[5].https://www.mpscacademy.com/2017/07/national-education-commissions-part2html#

[6]. National Education Policy 2020, Draft Govt. of India, Pg. No. 11

[7]. AISHE Report 2018-19, Govt. of India, 2019, Pg. No. 7

[8]. National Education Policy 2020, Draft Pg. No. 45

[9]. AISHE Report, Govt. of India, 2018-19 Pg. No. 7

[10]. National Education Policy 2020, Draft Govt. of India, Pg. No. 43

[11].https://www.topuniversities.com/university-rankings/world-university ranking/2021#top_ menu Date. 27 March 2021

[12]. AISHE Report, Govt. of India 2018-19 Pg. No. 14

[13]. AISHE Report, Govt. of India 2018-19 Pg. No 7

[14]. National Education Policy 2020, Draft Pg. No. 50

[15]. AISHE Report, Govt. of India 2018-19 Pg. No. 4